**पंतप्रधानांची कुवेतच्या पंतप्रधानांशी भेट**

22 डिसेंबर 2024

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज कुवेतचे पंतप्रधान महामहिम शेख अहमद अल-अब्दुल्ला अल-अहमद अल-सबाह यांच्याशी चर्चा केली.

2. उभय नेत्यांनी राजकीय, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, संरक्षण, सुरक्षा, आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान, सांस्कृतिक आणि दोन राष्ट्रांतील नागरिकांचे परस्पर संबंध यासारख्या क्षेत्रांमध्ये धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी भविष्यातील योजनेवर चर्चा केली. दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य अधिक दृढ करण्यावर त्यांनी भर दिला. ऊर्जा, संरक्षण, वैद्यकीय उपकरणे, औषधनिर्माण, फूड पार्क आणि इतर क्षेत्रातील नवीन संधी पाहण्यासाठी पंतप्रधानांनी कुवैती गुंतवणूक प्राधिकरण आणि इतर भागधारकांच्या शिष्टमंडळाला भारत भेटीसाठी आमंत्रित केले. पारंपारिक औषध आणि कृषी संशोधनातील सहकार्यावर देखील नेत्यांनी चर्चा केली. सहकार्यासाठी संयुक्त आयोग (JCC) वर नुकत्याच झालेल्या स्वाक्षरीचे त्यांनी स्वागत केले ज्याच्या अंतर्गत आरोग्य, मनुष्यबळ आणि हायड्रोकार्बन्स वरील विद्यमान JWG व्यतिरिक्त व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, तंत्रज्ञान, कृषी, सुरक्षा आणि संस्कृती या क्षेत्रात नवीन संयुक्त कार्यगटांची स्थापना करण्यात आली आहे.

3. नेत्यांनी चर्चेनंतर द्विपक्षीय करार आणि सामंजस्य करारांवर स्वाक्षरी आणि त्यांची देवाणघेवाण साक्षांकित केली. यामध्ये संरक्षण सहकार्य, सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रम, क्रीडा क्षेत्रातील सहकार्यावरील कार्यकारी कार्यक्रम यावरील सामंजस्य करार आणि कुवेत आंतरराष्ट्रीय सौर आघाडीमध्ये सामील होण्याबाबतचा फ्रेमवर्क करार यांचा समावेश होता.

4. पंतप्रधानांनी कुवेतच्या पंतप्रधानांना भारत भेटीचे निमंत्रण दिले.

**कुवेत सिटी**

**22 डिसेंबर 2024**